दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

वर्ष : ०५ | अंक : २०, पाने : ०६, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, गुरुवार, दि.०४ सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056







**आजचा सुविचार**

नेहमी लक्षात ठेवा...
तुमचे यशस्वी होण्याचे संकल्प
हे कोणत्या ही इतर संकल्पा पेक्षा
अधिक महत्वपुर्ण आहे...

– अब्राहम लिंकन






# देशात मुदतपूर्व निवडणूका, लागणार..?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, नागपूर :** लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी भाजपची मतचोरी उघडकीस आणल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारचे धाबे दणाणले आहेत. यामुळे पंतप्रधानांना पायउतार व्हावे लागणार असून देशात कधीही मुदतपूर्व निवडणूक होणार आहे. त्यामुळे काँग्रेस कार्यकर्त्यांनी आतापासून कामाला लागावे असे आवाहन काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले. यावेळी मतचोरी विरुद्धचे हे राज्यवापी आंदोलन घराघरात पोहचवा अशीही विनंतीही सपकाळ यांनी केली. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या वतीने बुधवारी नागपूर जिल्ह्यातील कामठी विधानसभा मतदारसंघातून राज्यस्तरीय 'व्होट चोर गद्दी छोड' आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. त्यावेळी सपकाळ बोलत होते.



**'त्या' चोराला सर्वात आधी धडा शिकवला पाहिजे, बावनकुळेंवर निशाणा**

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, कामठीतील मेळावा हा सरकारला इशारा असून लोकशाहीला हात लावाल तर खबरदार. नागपूरमधून ७५ वर्षाच्या नेत्यांना खूर्ची खाली करण्याचे आदेश निघाले आहेत, त्यामुळे मोदींच्या पायाखालची वाळू सरकली आहे आणि तो दिवस दूर नाही की देशात मध्यावधी निवडणुका होतील आणि शिव, शाहु, फुले व आंबेडकरांच्या विचाराचे नवे सरकार येईल. 'वोट चोर, गद्दी छोड' हा काँग्रेसचा नारा असून आता गप्प बसून चालणार नाही. या लढाईत सर्वांनी सहभागी झाले पाहिजे, असे सपकाळ म्हणाले. भारतीय जनता पक्ष मतचोरी करून सत्तेत आला आहे. महाराष्ट्रात मतचोरीचा पहिला प्रयोग भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कामठी मतदार संघात झाला. ज्या कामठीत मतचोरीची सुरवात झाली त्या चोराला सर्वात आधी धडा शिकवला पाहिजे. वोट चोर, गद्दी छोड,चा पहिला धमाका कामठीत झाला असून तो देशभर पाहोचला आहे. आता या मतचोरांना सत्तेतून खाली खेचल्याशिवाय गप्प बसणार नाही, असा इशाराही सपकाळ यांनी दिला.

**आपण विजयी झालो असे विचारत होते...**

विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी यावेळी भाजपा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर तोफ डागली, ते म्हणाले की, सरसंघचालक मोहन भागवत प्रत्येक दाम्प्त्याने ३ मुलांना जन्म द्यावा असे सांगतात परंतु चंद्रपूर जिल्ह्यातील मतदार यादीत एका घरी ५६ मुले दाखवण्यात आली आहेत आणि १० बाय १० च्या खोलीत १०९ मतदार दाखवले आहेत. भाजपने मतचोरी करून महाराष्ट्रात १३२ आमदार निवडून आणले आहेत. हे भित्रे लोक आहेत, वोट चोरी करून सत्तेत आले आहेत. भाजपाचे लोक एकमेकाला चिमटे घेऊन विचारत होते आपण विजयी झालो? भाजपाची सत्ता असल्याने मतचोरांना शिक्षा होणार नाही पण मतदार मात्र या मतचोरांना शिक्षा देणार आहे. महाराष्ट्रातील या मतदारचोरांना धडा शिकवला पाहिजे, जिल्हा परिषद निवडणुकीत मतचोरी करणाऱ्यांना धडा शिकवून त्यांची औकात दाखवा, असे वड्डेवार म्हणाले.

**राज्यातील मातब्बर नेत्यांची हजेरी**

कामठीतील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या परिसरात आयोजित सभेला रामटेकचे खासदार श्यामकुमार बर्वे, अमरावतीचे खासदार बळवंत वानखेडे, भंडारा-गोंदियाचे खासदार प्रशांत पडोळे, चंद्रपूरच्या खासदार प्रतिभा धानोरकर, विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, विधानपरिषदेतील काँग्रेसचे गटनेते सतेज पाटील, उमरेडचे आमदार संजय मेश्राम, माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी मंत्री सुनील केदार, माजी मंत्री यशोमती ठाकूर आदी उपस्थित होते.

## दगडूशेठ गणपती समोर अथर्वशीर्ष पठण विक्रमाची 'ग्लोबल बुक ऑफ एक्सलेंस, इंग्लंड' मध्ये नोंद

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०३, पुणे :** पुण्यातील श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती कोट्यावधी भाविकांचे श्रद्धास्थान आहे. गणेश उत्सव काळात दरवर्षी ऋषिपंचमी दिवशी हजारो महिला भगिनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती समोर सामूहिक अथर्वशीर्ष पठण करतात. यावर्षी ३५ हजार २१५ महिलांनी यामध्ये सहभाग घेतला होता. हा एक जागतिक विक्रम आहे. याची नोंद 'ग्लोबल बुक ऑफ एक्सलन्स, इंग्लंड' मध्ये करण्यात आली आहे. या वर्ल्ड रेकॉर्डचे प्रमाणपत्र 'ग्लोबल बुक ऑफ एक्सलन्स, इंग्लंड' या संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. दीपक हरके यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट चे कोषाध्यक्ष महेशराव सूर्यवंशी यांना नुकतेच प्रदान केले. यावेळी ट्रस्टचे विश्वस्त मंडळ सदस्य व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या वतीनेही डॉ. दीपक हरके यांचा शाल, श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला व त्यांच्या हस्ते गणपतीची आरती करण्यात आली. यावेळी डॉ. हरके यांनी गणेश भक्त, भाविकांना गणेशोत्सवाच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या.

## पुरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात लावा... मुदखेड काँग्रेसची तहसील प्रशासनाकडे साकडे



**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०३, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड तालुक्यांत अतिवृष्टीने शेतकरी आणि नागरिकांच्या घरांचे मोठे नुकसान झाले असून तात्काळ सरसकट शासन अनुदान देण्याची मागणी काँग्रेस तालुका व शहर कमिटीने तहसील प्रशासनाकडे केली आहे.

मघा नक्षत्रात जवळपास एकूण पावसाच्या २५% पाऊस झाल्याने शेती सोबतच तालुक्यांतील विविध गावांतील घरांमध्ये पुराने थैमान घातले. मुदखेड तालुक्यांतील वरदडा तलाव फुटल्याने राजवाडी, पिंपळकौठा मगरे, डोणगाव मध्ये पूर परिस्थिती निर्माण झाली. शेती उध्वस्त झाली आणि गांवात पाणी शिरले. यासोबतच सीता नदीला महाप्रलय आल्याने आजूबाजूची हजारो हेक्टर जमीन पाण्याखाली गेली. तालुक्यातील वीस हजार हेक्टर शेती अतिवृष्टीमुळे बाधित झाली असून पिके वाहून गेली आहेत.

काँग्रेस पक्षाच्या वतीने अतिवृष्टी आणि पूर पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी सरकारने लवकरात लवकर आर्थिक अनुदान जारी करावी अशा आशयाची निवेदन नायब तहसीलदार मारोती जगताप यांना दिले. यावेळी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, शहराध्यक्ष कैलास गोडसे, करीम खाँ साब, युवक शहराध्यक्ष मुजीब पठाण, गिरीश कोत्तावार, सूर्यकांत चौदंते, श्रीनिवास महादवाड, शिवाजी वडजे, ऋषिकेश चौदंते, अविनाश चौदंते, संपादक अजगर हुसेन, बाळू क्षीरसागर, लतीफ टेलर, महेश पवार, शिवानंद देवके, पत्रकार अतिक अहमद, मोईन फुलवाले, शिवाजी बोकेफोड, यशवंत रणखांबे, आकाश सोनटक्के, जनार्दन मुदखेडकर, रमेश बोडके, संतोष मेटकर, मारोती गाढे यांच्यासह काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


**कोल्हापूरच्या धर्तीवर निर्णय घ्यावा...**

नांदेड जिल्ह्यातील पूरग्रस्तांना २०१९ सालच्या कोल्हापूर येथील शासन निर्णयानुसार भरीव तरतूद मिळावी अशी मागणी संदीपकुमार देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या शासन निर्णयानुसार पूरग्रस्तांची कर्जमाफी, प्रचलित अनुदानाच्या तिप्पट अनुदान, घरकुल योजना, पूर पिडीत घरांना २४ ते ३६ हजार रु. तात्काळ अनुदान इत्यादी महत्त्वपूर्ण आर्थिक तरतुदी या अंतर्गत आहेत. अशा प्रकारचा शासन निर्णय नांदेड जिल्ह्यांतील पूरग्रस्तांसाठी लागू करावा, अशी एकमुखी मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे.

## बिबट्याने घेतला शेतकऱ्याचा बळी; पारनेर तालुक्यातील घटना

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील कळस येथिल बेल्हे रानमळा रस्त्यावर मंगळवारी रात्री ७ वाजता एक भीषण घटना घडली. बिबट्याच्या हल्ल्यात एका शेतमजूराचा मृत्यू झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.



कळस येथिल हल्लात ठार झालेला व्यक्ती गवंड्याच्या हाताखाली शेतमजूराचे काम करत होता. मंगळवारी रात्री ७ वाजण्याच्या सुमारा कळस येथे बिबट्याच्या प्राणघातक हल्ल्यात गणेश तुळशीराम गाडगे (वय ४०) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना गावापासून दीड किलोमीटर अंतरावरील रानमळा रस्त्याला सुतार वस्तीजवळ घडली. आपले काम आटोपून गणेश गाडगे हे कळस गावाकडून रानमळ्याच्या रस्त्याने घरी येत असताना बिबट्याने त्यांच्यावर अचानक हल्ला केला. रात्री आठ वाजेपर्यंत गणेश घरी न आल्याने कुटुंबीयांनी शोधाशोध केली असता हा प्रकार उघडकीस आला. स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने गणेश गाडगे यांना टाकळी ढोकेश्वर येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. मात्र तेव्हाच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या घटनेमुळे पुन्हा एकदा कळस परिसरात बिबट्याची दहशत निर्माण झाली असून ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कळस परिसरात उसाचे प्रमाण जास्त असल्याने बिबट्यांचा वावर नेहमीच असतो. यापूर्वीही जनावरांवर बिबट्यांचे हल्ले झाले आहेत, परंतु मानवी जीवितहानीची ही पहिलीच घटना आहे. या हल्ल्यामुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. ग्रामस्थांनी सांगितले की, बिबट्यांचा धोका वाढल्याने रात्रीच्या वेळी बाहेर पडणे धोकादायक बनले आहे. विशेषत: रात्रीच्या वेळी शेतातून घरी परतताना अथवा बाहेर पडताना रात्रीच्या वेळी ग्रामस्थांना सतत भय वाटते. या घटनेनंतर स्थानिकांनी वनविभागाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. वनविभागाने या घटनेची गंभीर दखल घेऊन तपास सुरू केला आहे. ग्रामस्थांनी रात्री एकट्याने बाहेर न पडण्याचे आणि सतर्क राहण्याचे आवाहन वनविभागाने केले आहे. या घटनेमुळे गणेश गाडगेंच्या निधनाने गावात शोककळा पसरली आहे.

**गाडगे कुटुंबियांना आर्थिक मदत द्या – बाळासाहेब खिलारी**

वन्यप्राण्याच्या हल्ल्यात मृत्यू पावलेल्या गणेश गाडगेंच्या कुटूंबियांना जन वन विकास योजनेअंतर्गत प्रशासनाने तातडीने आर्थिक मदत द्यावी या घटनेनंतर कळस आणि आसपासच्या गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वनविभागाने व प्रशासनाने त्वरित उपाययोजना कराव्यात, तालुक्यात बिबट्यांच्या वाढत्या हल्ल्यांमुळे शेतकरी आणि ग्रामस्थांमध्ये प्रचंड असुरक्षितता निर्माण झाली आहे. बिबट्यांच्या संख्येवर नियंत्रण आणावे अशी मागणी निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी केली आहे. रात्रीच्या वेळी आणि पहाटे शेतात जाणे धोकादायक ठरत असल्याने लोकांनी अधिक काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रशासनाने तातडीने या परिस्थितीवर तोडगा काढावा अशी ग्रामस्थांची मागणी आहे.


## इरई धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे पूरस्थिती ; शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांची नासाडी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, विसापूर (चंद्रपूर) :** मागील चार पाच दिवसापासून पावसाच्या जलधारा बरसत आहे. अशातच इरई धरणातील सातही दरवाज्यातून पाणी विसर्ग केल्या जात आहे. परिणामी वर्धा व इरई नदीच्या काठावरील शेतपिके पाण्याखाली आली आहे. शेतकरी उघड्या डोळ्यांनी पिकांची नासाडी पाहत आहे. यामुळे बळीराजा हवालदिल झाला आहे. याचा सर्वाधिक फटका बल्लारपूर तालुक्यातील हडस्ती, चारवट, नांदगाव (पोडे ), विसापूर, बल्लारपूर, बामणी, दहेली, लावारी, कळमना, आमडी आदी भागातील हजारोवर शेतकऱ्यांना बसला आहे. याला कारणीभूत इरई धरणातील पाण्याच्या विसर्ग असल्याचा आरोप माजी जिल्हा परिषद सदस्य रामभाऊ टोंगे यांनी केला आहे. ऐन पोळा सणाच्या दोन दिवसा अगोदर वर्धा नदीच्या पुराने शेतकऱ्यांची दैनावस्था केली. शेकडो हेक्टर मधील पिकांची पुराने नासाडी झाली. मात्र शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे अद्याप झाले नाही. अशातच इरई धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे पूरस्थिती निर्माण झाल्याने १५ दिवसात दुसऱ्यांदा शेतकऱ्यांना हवालदिल केले आहे.

पूराने नेहमी शेतजमीन खरवडून जाते. मात्र नुकसान भरपाई देताना याचा लाभ शेतकऱ्यांना मिळत नाही. दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना चंद्रपूर जिल्ह्यात कधीच चारा डेपो देण्यात आला नाही. शासनस्तरावरून निर्णय घेतला जाते. मात्र त्याची अंमलबजावणी केवळ विशिष्ठ भागातच केली जाते. हे आमच्या भागातील शेतकऱ्यांचे दुर्दैव आहे. जनप्रतिनिधी देखील यावर बोलत नाही. ही खंत आहे.

**– रामभाऊ पाटील टोंगे**
**माजी सभापती, कृषी उ.बा.स.चंद्रपूर.**



बल्लारपूर तालुक्यातील कृषीक्षेत्र कोरडवाहू आहे. निसर्गाच्या जलचक्रावर कृषी व्यवसाय अवलंबून आहे. मात्र मानव निर्मित इरई धरणातील पाण्याच्या विसर्ग शेतकऱ्यांच्या जीवावर नेहमी उठत आहे. परिणामी हातात येणारे कापूस, सोयाबीन, भात, तूर, भाजीपाला व अन्य कडधान्य पिकांची पुराने नासाडी झाली आहे. इरई नदीपात्राचे खोलीकरण करण्यात आले. मात्र पूरस्थितीने याचे पितळ उघड केले आहे. इरई धरणातील पाण्याच्या विसर्ग शेतकऱ्यांना उद्धवस्त करणारा ठरला आहे.




## समानतेची धाव...

महिलांचे क्रिकेट म्हणजे केवळ 'मुलीही खेळतात बरं,' असे सांगणारे प्रतीकात्मक सामने नव्हेत, हे सिद्ध करणारी घोषणा आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने केली आहे. या महिन्याच्या अखेरीस रंगणाऱ्या वर्ल्ड कप महिला एकदिवसीय सामन्यांत बक्षिसांच्या रकमेत मजबूत वाढ करण्यात आली आहे. विजेत्या संघाला आता ३९.५५ कोटी रुपये देण्यात येतील. महिला एकदिवसीय स्पर्धांच्या इतिहासातील ही सर्वाधिक रक्कम आहे. गेल्या स्पर्धेतील विजेत्यांना ११.६५ कोटी देण्यात आले होते. त्या तुलनेत ही वाढ तब्बल चारपट आहे. दोन वर्षांपूर्वी पुरुषांच्या एकदिवसीय स्पर्धेतील विजेत्या ऑस्ट्रेलियाला ३५.३१ कोटी मिळाले होते. त्याहूनही ही रक्कम अधिक आहे, हे विशेष. क्रिकेटमधील पैसा प्रचंड वेगाने वाढतो आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेची उलाढाल तब्बल ६०० कोटी डॉलर एवढी अवाढव्य आहे. साहजिकच नवनवे खेळाडू आकर्षित होत आहेत. यात जगभर मोठ्या संख्येने मुली असल्या तरी पुरुष खेळाडूंना दिल्या जाणाऱ्या मानधनाशी तुलनाही होऊ नये एवढी कमी रक्कम सातत्याने महिलांना दिली जात होती, त्यात अलीकडे सुधारणा होऊ लागली आहे. टेनिस, ज्युदो, स्कीइंग आणि बॅडमिंटन यांसारख्या खेळांमध्ये पुरुष आणि महिलांना समान बक्षीस रक्कम दिली जाते. क्रिकेट आणि फुटबॉलसारखे खेळ मात्र मोठा भेदभाव करतात. याचे कारण देताना महिलांच्या खेळांना मिळणाऱ्या अल्प प्रतिसादाचे कारण पुढे केले जाते. त्यात तथ्य आहेही; मात्र असे म्हणणाऱ्यांनी महिलांना खेळाची मैदाने कधी उपलब्ध झाली तेही बघावे. १८९६ मध्ये अथेन्समध्ये पहिले ऑलिम्पिक सामने झाले, त्यात महिलांना मज्जाव होता. १९४०च्या दशकात पहिली महिला व्यावसायिक क्रीडा लीग झाली. म्हणजे व्यावसायिक खेळाचे दरवाजे उघडण्यासाठी त्यांना ५० वर्षे लढावे लागले! त्यानंतर स्वत:ला सिद्ध करणे आणि खेळ लोकप्रिय होण्याची गोष्ट. प्रसारण हक्कांचीही समस्या आहे. महिलांचे खेळ माध्यमांतून इतके कमी दिसतात की त्यातून खेळ लोकप्रिय होणे, चाहते निर्माण होणे कठीण. यातून पुरुषी व्यवस्थेला अनुकूल असे विषारी चक्र सुरू राहते. आधीच्या पिढीतील महिलांनी खडतर मार्गावरून क्रिकेट पुढे नेले. मानधन इतके कमी असायचे की क्रिकेट खेळण्यासाठी खिशातून पैसे घालावे लागल्याची आठवण भारतीय महिला संघाच्या माजी कर्णधार सुधा शाह यांनी नोंदवली आहे. आयसीसीने महिलांसाठी बक्षिसाच्या रकमेमध्ये घसघशीत वाढ केली तरी अद्याप पुरुषांची बरोबरी गाठायची आहे, ते लवकरच घडो!

## मूल होण्यासाठी औषध देतो... दागिने कापडात ठेवा अन...

**दि.०३, सांगली :** मिरज तालुक्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मूल होण्याचं औषध देऊन एका महिलेचे दागिने लंपास करण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे या घटनेनंतर कुणावरही अशाप्रकारे विश्वास ठेवू नये, अशी चर्चा सर्वसामान्यांमध्ये होत आहे. या घटनेतील पीडित दाम्पत्याने पोलीस ठाण्यात तक्रार केली. पोलिसांनी या घटनेची गंभीरपणे दखल घेतली. पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत आरोपीचा शोध घेतला आणि पोलिसांना तपासात यश आलं. पोलिसांनी अतिशय चाणाक्ष पद्धतीने आरोपीच्या मुसक्या आवळल्या. पोलिसांच्या या कारवाईने दाम्पत्याला दागिने परत मिळाले आहेत. त्यामुळे पोलिसांच्या कामाचं देखील कौतुक होत आहे. पण आरोपीने ज्या प्रकारे फसवणुक केली तेदेखील धक्कादायक आहे.

मिरज तालुक्यातील एरंडोली येथील दाम्पत्याला मूल होण्याचे औषध देतो, असे सांगून त्यांच्याकडील दागिने लंपास करणाऱ्या इंदापूर येथील एकाला अटक करण्यात आली आहे. आरोपीकडून कारसह दागिने असा ५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आल्याची माहिती एलसीबीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतीश शिंदे यांनी दिली आहे.

# महाराष्ट्रातील राजकारणात ओबीसी आरक्षणाचा बळी जाण्याची शक्यता

**भाग-२**

**ओबीसी आरक्षण...**

या विषयावर काल 'महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये ओबीसीच्या आरक्षणाचा बळी जायला नको यासंदर्भात एक लेख लिहिलेला होता. या लेखाला दिलेला आपण प्रतिसाद निश्चितच ओबीसी बांधव जागरूक, सावध व या विषयावर बारीक लक्ष ठेवून आहेत याची जाणीव मला झाली. या लेखामध्ये स्पष्ट नमूद केलेले होते की आज ओबीसी आंदोलनाला एका प्रभावी नेत्याची निश्चितच आवश्यकता आहे. आज जे नेते या संदर्भात काम करत आहेत ते निश्चितच आपापल्या परीने अत्यंत उत्कृष्ट काम करत आहेत तथापि एक राज्य पातळीवरील प्रभावी नेता म्हणून छगन भुजबळ साहेबांना सर्व मान्यता आहे. आणि यामध्ये भुजबळ साहेबांनी ताकतीनिशी सहभागी होणे हे नितांत गरजेचे आहे.

भुजबळ साहेबांनी अत्यंत योग्य वेळी पत्रकार परिषद घेऊन ओबीसी समाजाची ताकद व एकता दर्शवून दिली यासाठी त्यांचे मनःपूर्वक धन्यवाद .

कालच्या पत्रकार परिषदेमध्ये भुजबळ साहेबांनी व त्यांच्यासोबत असलेल्या ओबीसी नेत्यांनी ओबीसी समाजाची भूमिका अत्यंत चांगल्या प्रकारे स्पष्ट केली . ओबीसी आरक्षणाला सध्या न्यायालयाने दिलेले निकाल अत्यंत मजबूतपणे चौकट म्हणून उभे आहेत. त्यामुळे ओबीसीचे आरक्षण सहजासहजी पळवता येणार नाही हे खरे असले तरी सावध असणे काळाची गरज आहे.

कालच्या पत्रकार परिषदेमध्ये न्यायालयाचे दाखले देऊन ओबीसी आरक्षणामध्ये राज्य पातळीवर राज्य सरकारला ओबीसी आरक्षणात कोणालाही समाविष्ट करता येत नाही हे अत्यंत ठळकपणे नमूद केले. वेगवेगळ्या ठिकाणची गॅझेटर्स उपलब्ध करून त्या योगे आपला मुद्दा रेटण्याचा मनसुबा दिसत असला तरी यामध्ये मराठा व कुणबी अशी स्वतंत्र आकडेवारी दिलेली आहे.हे दोन्ही प्रवर्ग वेगवेगळे आहेत असे म्हणण्याला वाव आहे असे कालच्या पत्रकार परिषदेमध्ये स्पष्ट नमूद केले आहे. तरीही न्यायालयासमोर ही गॅजेटि अर्स

जातील त्यावेळी वेगवेगळ्या पद्धतीने याची तपासणी होऊन या मधला निश्चित निष्कर्ष काढला जाईल. त्यावेळी मात्र आम्ही अधिक तत्पर असण्याची आवश्यकता आहे.

आता सुरू असलेले मराठ्यांचे आंदोलन इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये होईल अशी अपेक्षा ओबीसी नेत्यांना नसावी आणि सरकारलाही नसावी . त्यामुळे ओबीसी समाजाच्या आंदोलनासाठीची पूर्वतयारी करण्यात आल्याचे दिसून येत नाही. तथापि मराठी समाजाच्या आंदोलनाने हे मोठे स्वरूप प्राप्त केल्यानंतर त्याला तेवढ्याच ताकतीने उत्तर देण्यासाठी ज्या पद्धतीने सध्या ओबीसी नेते उभे राहिलेले आहेत ते निश्चितच कौतुकास्पद व अभिनंदनीय आहे. इतक्या कमी वेळामध्ये त्यांनी आपल्या आंदोलनाला निश्चित चांगले स्वरूप दिलेले आहे. मुंबईमध्ये झालेल्या कालच्या बैठकीला बहुसंख्य ओबीसी नेते उपस्थित असल्याचे दिसत होते. तथापि वेगवेगळ्या पक्षातले ओबीसी आमदार किंवा खासदार हे मात्र या ठिकाणी दिसले नाहीत, ही ओबीसीसाठी मोठी सामाजिक कमतरता आहे. मराठी समाजाने जे आंदोलन उभे केले आहे त्याचे स्वरूप पाहता याच्या विरोधात आपण जायला नको अशी राजकीय गणित साधण्याची भूमिका आमदार आणि खासदार मंडळींनी घेतलेचे दिसून येत आहे.

कालच्या पत्रकार परिषदेमध्ये अत्यंत आवर्जून नमूद करावा असा एक मुद्दा माननीय भुजबळ साहेबांनी परत परत ठासून सांगितलेला आहे. जर का ओबीसी समाजाच्या आरक्षणातून मराठा समाजाला आरक्षण देण्याचा प्रयत्न झाला किंवा दिले गेले तर दुसऱ्या दिवशी आम्ही आपल्या विरुद्ध कोर्टामध्ये हजर आहोत याची सरकारने नोंद घ्यावी.




आजच्या घडीला जरी मराठा समाज एवढ्या मोठ्या प्रमाणात आंदोलन करत असले तरी कायदेच्या दृष्टीने आम्ही निश्चितच वरचढ आहोत हे सत्य आहे. तरीही कायदा बदलण्याची ताकद सरकारमध्ये असल्याने सावध राहणे आवश्यक आहे.हे सर्व खरे असले तरी सर्व ओबीसी बांधवांनी या आंदोलनामध्ये आपला सहभाग नोंदवणे आवश्यक आहे.

एखाद्या आंदोलनाला दिशा देण्याचे काम नेतेमंडळी करत असली तरी या आंदोलनाला गती देणे व ते अखंड चालू ठेवणे, त्याच्यामध्ये ऊर्जा भरणे यासारखे महत्वपूर्ण टप्पे तरुणांच्या खांद्यावर असतात. यासाठी ओबीसी समाजातील तरुण वर्गाला जागे करणे. एकत्रित करणे , आजच्या घडीला ओबीसी आरक्षणाचे महत्त्व त्यांना समजून सांगणे व आपल्यातला जातीचा वेगळेपणा बाजूला ठेवून एकजुटीने ओबीसी म्हणून उभे राहणे हे आपले कर्तव्य आहे हे त्यांच्यापर्यंत पोहोचवणे गरजेचे आहे.

**आपला**
**राम पडघे**
**अध्यक्ष श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था सातारा महाराष्ट्र.**

## ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठी संस्थेमार्फत चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, सातारा :** सध्या ओबीसी आरक्षणातून इतर प्रवर्गाला आरक्षण देणे संदर्भात होत असलेल्या हालचाली पाहता ओबीसी चे आरक्षण वाचवण्यासाठी श्री संताजी शैक्षणिक व सामाजिक विकास संस्था सातारा महाराष्ट्र या संस्थेमार्फत चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य यांना निवेदन देण्यात आले. ओबीसी आरक्षणासंदर्भात न्यायालयाने कोणत्याही प्रवर्गाला राज्यस्तरावरती यामध्ये समाविष्ट करू नये असे निर्देश दिलेले आहेत. तरीही सध्याची परिस्थिती व या संदर्भातली हालचाली पाहता अधिक काळजी घेणे आवश्यक आहे. यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील समस्त तेली बांधवांचेवतीने संस्थेमार्फत चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन देण्यात आले. त्याचवेळी जिल्हाधिकारी सातारा यांच्यामार्फत शासनालाही हे निवेदन पाठवण्यात आले. यावरती ठोस कारवाई होण्याचे दृष्टीने



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही या निवेदनाची प्रत पाठवण्यात आली.

निवेदन बारकाईने पाहताना चंद्रशेखर बावनकुळे साहेब म्हणाले, मी निश्चितच याबाबत सकारात्मक विचार करेल. यासंदर्भात चर्चा करताना संस्थेचे अध्यक्ष राम पडघे म्हणाले, ओबीसी समाजासाठी सध्या फक्त १९ टक्के आरक्षण असून यामध्ये ओबीसीच्या ३७३ जाती समाविष्ट आहेत. आता यामध्ये कोणताही मोठा प्रवर्ग समाविष्ट केल्यास ओबीसी समाजावर फार मोठा अन्याय होणार आहे. यासाठी न्यायालयाने दिलेल्या निर्देशाचे पालन करण्यात यावे व ओबीसी वरती कोणताही अन्याय होऊ नये.

यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहिलेले होते व सर्वांच्या उपस्थितीमध्ये

बावनकुळे साहेबांना निवेदन देण्यात आले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष राम पडगे, उपाध्यक्ष विठ्ठलराव शिरसागर, जिल्हाध्यक्ष संजय शेडगे, सचिव नामदेवराव झगडे, तालुका अध्यक्ष प्रवीण रोकडे, राजेंद्र किरवे, प्रदीप देशमाने, महिला अध्यक्ष सुरेखा हाडके, सदस्य संजय भोज, विक्रम शिरसागर, पोपटराव भोज, अरुण किरवे राजेंद्र हाडके इ. अनेक बांधव उपस्थित होते.

## अमेरिकेला शह देण्यासाठी चीन, रशिया, भारत यांची युती

चीनच्या शांघाय शहरात नुकतीच एक आंतरराष्ट्रीय शिखर परिषद पार पडली. या शिखर परिषदेत अनेक राष्ट्रांचे प्रमुख उपस्थित होते मात्र सर्वांचे लक्ष होते ते जिनिपिंग, पुतिन आणि मोदी या चीन, रशिया आणि भारत या देशांच्या राष्ट्र प्रमुखांकडे. जिनिपिंग, पुतिन आणि मोदी हे तीन नेतेच या शिखर परिषदेत केंद्रस्थानी होते त्याचे कारणही तसेच होते अमेरिकेने भारत आणि चीनवर टाकलेल्या टॅरीफ बॉम्ब नंतर होणारी ही पहिलीच शिखर परिषद होती.

चीन आणि भारतावर टाकलेल्या टॅरीफ बॉम्बमुळे चीन आणि भारताचे अमेरिकेशी असलेले संबंध बिघडले आहेत तर रशियाने युक्रेनशी सुरू असलेले युद्ध थांबवावे यासाठी पुतिन आणि ट्रम्प यांच्यात झालेली बैठक फिस्कटली त्यामुळे या दोन्ही देशात देखील तणाव निर्माण झाला त्या पार्श्वभूमीवर ही शिखर परिषद खूप महत्वाची मानली जात होती. अमेरिकेला शह देण्यासाठी ही परिषद आयोजित केली असे मानले जात होते त्यामुळे या शिखर परिषदेतून अमेरिकेला कोणता इशारा दिला जाईल याकडे जगाचे लक्ष लागले होते.

तसा इशारा या शिखर परिषदेतून अमेरिकेला दिलाही गेला. भारत, चीन आणि रशिया हे तिन्ही देश एकत्र आल्याचे या निमित्ताने जगाने पाहिले. भारत आणि रशिया यांची मैत्री तर जगजाहीर आहे आता भारत आणि चीन यांचे देखील संबंध सुधारत आहे. जर हे तीन देश एकत्र आले तर अमेरिकेला शह देतील असा इशारा या निमित्ताने दिला गेला आणि तो अमेरिकेपर्यंत पोहचला देखील म्हणूनच या शिखर परिषदेनंतर अमेरिकेने भारतावर टीका केली. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड टीम यांचे व्यापार विषयक सल्लागार आणि भारताचे विरोधक असलेले पीटर नवारो यांनी शांघाय सहकार्य परिषदेच्या निमित्ताने मोदी, पुतिन आणि जिनिपिंग यांची झालेली भेट त्रासदायक असल्याचे म्हटले आहे. भारताने चीन आणि रशिया सोबत नव्हे तर अमेरिका, युक्रेन आणि युरोप सोबत असायला हवे असे त्यांनी म्हटले आहे. पीटर नवारो यांच्या या वक्तव्यातून भारताने रशिया आणि चीनशी केलेली युती अमेरिकेच्या मर्मावर बोट ठेवणारी ठरली हे स्पष्ट झाले.

नवारो यांच्या या वक्तव्यातून शांघाय शिखर परिषदेचा हेतू सफल झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. भारत, चीन आणि रशिया हा त्रिकोण तयार झाल्यास अमेरिकेलाच त्याचा सर्वाधिक त्रास होईल असे जाणकारांनी याआधीच सांगितले आहे. संयुक्त राष्ट्रातील अमेरिकेच्या माजी राजदूत असलेल्या निकी हॅले यांनी आधीच असा इशारा डोनाल्ड ट्रम्प यांना दिला होता तो खरा ठरताना दिसत आहे. आज भारत, रशिया आणि चीन एकत्र येत आहे त्याचा अमेरिकेला पोटशूळ झाला आहे पण याला तेच जबाबदार आहेत.

डोनाल्ड ट्रम्प हे आपल्या हेकेखोर स्वभावामुळे अमेरिकेलाच अडचणीत आणत आहे काही कारण नसताना ट्रम्प यांनी भारत आणि चीनवर भरमसाठ टॅरीफ लावले. भारत आणि चीनने विनंती करूनही ट्रम्प यांनी ते कमी केले नाही. त्यांना वाटले भारतावर टॅरीफ लावल्याने भारत झुकेल आणि ट्रम्प सांगेल तसे वागेल. कोणाचे कोणावाचून अडत नाही, प्रत्येक गोष्टीला पर्याय असतो हे ते विसरले. भारताने पर्याय शोधला आणि मग अमेरिकेला जाग आली. आता नवारो म्हणतात मोदींबद्दल माझ्या मनात खूप आदर आहे.

मला भारतीय लोक खूप आवडतात. आज मोदी आवडतात म्हणणारे नवारो काही दिवसांपूर्वी मोदी आणि भारतावर टीका करत होते. वास्तविक भारताने अमेरिकेला कायम मित्र मानले. पंतप्रधान मोदी तर ट्रम्प यांना जाहीरपणे माय डिअर फ्रेंड डोनाल्ड असे म्हणत असे पण डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या हेकेखोर स्वभावामुळे भारतासारखा मित्र गमवला. केवळ भारतच नाही तर भारतासारख्या अनेक देशांवर टॅरीफ लावून अमेरिकेने दुखावले आहे. भविष्यात ते देखील अमेरिके विरुद्ध एकत्र आले तर आश्चर्य वाटायला नको. ट्रम्प यांच्या या आतातताई भूमिकेचा अमेरिकेचे नागरिकही निषेध करत आहे.

एकदा नव्हे तर दोनदा ट्रम्प यांच्या धोरणाविरुद्ध अमेरिकन नागरिक रस्त्यांवर उतरले होते मात्र त्यातूनही ट्रम्प यांनी काही धडा घेतला नाही. त्यांच्या आतताई धोरणामुळे चीन, रशिया, भारत असा नवा त्रिकोण तयार झाला. हा त्रिकोण जर मजबूत झाला तर भविष्यात अमेरिकेला नक्कीच शह देईल यात शंका नाही.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

### महोत्सव...

**मोरया मोरया गजरी**
**श्रीबाप्पा विराजमान**
**आवाहन गणरायाचे**
**आनंदा आले उधाण**

**मिरवणूकी उत्साहात**
**मात्रराखे समाजभान**
**शास्त्रोक्तमंत्रोच्चारात**
**उजळे भक्तीचेलुभान**

**डि जे संयमी वाजला**
**राखे डेसिबलसन्मान**
**शाबीत राहतात कान**
**उंचावे सुखानंदे मान**

**पर्यावरण पूरक मूर्त्यां**
**होई निसर्गा अभिमान**
**आरासही देखणे छान**
**विषय सार्थ उर्जावान**

**रक्त दान अवयव दान**
**कुठेभुकेल्या अन्नदान**
**अभिनव उपक्रम रंगे**
**कार्यक्रम जोडे संधान**

**व्याख्यानमालारंगल्या**
**कलाकारास्तव खदान**
**गणराज कलांचे दैवत**
**कित्येकां सुसंधीप्रदान**

**- हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# अक्षराज

## गौरी गणपती सजावट विशेष



हरेश पाटील, कोपरखैरणे (नवी मुंबई) यांच्या घरची कोंबड्यावर बसलेली गौरी माता



नितीन बिडे , मु. पोस्ट - पिलीव, जि. सोलापूर यांच्या घरातील गौराई



जीवन आलिमकर, मु. खार्डीगाव, ता. जि. ठाणे यांच्या घरचा बाप्पा



सचिन भोईर, दिवा ता. जि ठाणे यांच्या घरचा गणपती बाप्पा



ज्योती राजकांत पाटील, दिवा ता. जि. ठाणे यांच्या घरचा गणपती बाप्पा



मनोहर काठे ( शिळगांव पोस्ट- पडले ता.जी ठाणे) यांच्या घरचा बाप्पा



अमित पाटील (डोंबिवली, उंबार्ली गाव, ता. जि. ठाणे) यांच्या घरातील गौरी गणपती



अमोल भोईर (डोंबिवली, भोईर वाडी खांबाळपाडा, ता. जि. ठाणे) यांच्या घरच्या गौराई



ज्ञानेश्वर भोईर, (डोंबिवली भोईरवाडी खाबाळपाडा ता. जि. ठाणे) यांच्या घरातील गौरी गणपती



संदीप गायकर (डोंबिवली, दावडी, ता. जि. ठाणे) यांच्या घरातील गौरी गणपती



सागर भोईर (डोंबिवली भोईरवाडी खांबाळपाडा, जि. ठाणे) यांच्या घरचा बाप्पा




उषा मुंडे, दिवा ता. जि ठाणे यांच्या घरच्या बाप्पाचे
पत्रकार विनोद वास्कर परिवाराने घेतले मनोभावाने दर्शन

अक्षराज





किशोर रेपाळे, पुणेवाडी,ता.पारनेर,जि.अहिल्यानगर यांच्या घरच्या गौराई



स्वामी दळवी, नऱ्हेगाव (पुणे) यांच्या घरचा गणपती बाप्पा



विश्वास खारपाटील (मु.खार्डीगाव, ता.जि.ठाणे, दिवा स्टेशन-पुर्व) यांच्या घरचा गणपती बाप्पा



स्वामी दळवी यांच्या अणदूर गावच्या घरचे गौरी गणपती



प्रवीण गिरे, खारघर (नवी मुंबई) यांच्या घरचा बाप्पा



सुनित म्हात्रे, कोपर, डोंबिवली - ठाणे) यांच्या घरचा गणपती बाप्पा



प्राजक्ता ठवरे, ऐरोली (नवी मुंबई) यांच्या घरच्या गौराई



अभिजित म्हात्रे ठाकूरपाडा (ठाणे) यांच्या घरचा गणपती बाप्पा



सचिन पाटील (वाशीगांव, नवी मुंबई) यांच्या घरचा बाप्पा



अपर्णा भोईर नारिवली जि. ठाणे त्यांच्या घरातील गौरी माता

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रात भावपूर्ण वातावरणात गौरी- गणपतींना निरोप

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०३, पनेवल :** महापालिका क्षेत्रातील कळंबोली, कामोठे, पनवेल, खारघर या चारही प्रभागात मंगळवारी सुमारे १२ हजार ६१४ पेक्षा अधिक घरगुती व सार्वजनिक गणपतींचे भाक्तिमय वातावरणात नियोजनबध्द शांततेत विसर्जन करण्यात आले. माझी वसुंधरा ६.० अंतर्गत स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त पनवेलसाठी पनवेल महानगर पालिका विविध उपक्रम राबवित आहे. या अंतर्गतच सणांचं पावित्र्य आणि पर्यावरणाचे भान राखले जावे यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यासाठी 'उत्सव गणरायाचा जागर पर्यावरणाचा' ही मोहिम हाती घेतली आहे. गणेशभक्तांच्या सोयी - सुविधांसाठी पालिकेच्या बांधकाम विभाग, आरोग्य विभाग,



विद्युत विभाग, परवाना विभाग, भांडार विभाग, वाहन विभाग व वैद्यकीय विभाग, पर्यावरण विभाग या ८ विभागांच्या म ाध्यमातून समन्वय साधून विसर्जन घाटांवरती संपूर्ण तयारी करण्यात आली होती. याकामी विविध एनजीओ, सामाजिक संघटना देखील महापालिकेस सहकार्य करत आहेत. यावर्षी महापालिकेच्यावतीने एकुण १३४ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली आहे. यामध्ये ५८ ठिकाणी नैसर्गिक विर्सजन ठिकाणे असून ७६ ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली होती. या सर्व विसर्जनाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटिव्ही स्टेज, टॉवरची सोय, टेबल खुर्च्या, लाऊड स्पीकर, निर्माल्य कलश, लाईव्ह जॅकेटची सोय करण्यात आली आहे.

दरम्यान विसर्जन कार्यक्रम सुरळित पार पडावा यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार सर्व उपायुक्त व सहाय्यक आयुक्त, प्रभाग अधिकारी व कर्मचारी यांनी पालिकेच्या सर्व विसर्जन ठिकाणांना भेटी देऊन व्यवस्थेचे निरीक्षण करून व्यवस्थापन करत होते. पोलिस विभागाच्या वतीने चोख बंदोबस्त करण्यात आला होता. तसेच वैद्यकीय आरोग्य विभागाच्या वतीने प्रत्येक विसर्जन स्थळांवरती प्राथमि क उपचारार्थ सेवा देण्यात आली होती.

अक्षराज



# थोडक्यात

## सुपा टोलनाका कायमस्वरूपी बंद करा - रविश रासकर

### कामगार नेते रासकर यांचे दिनांक ०९ सप्टेंबर रोजी उपोषण



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, अहिल्यानगर :** शिरूर – नगर हायवेवर असलेला सुपा टोलनाका कायमस्वरूपी बंद करा अशी मागणी कामगार नेते रविश रासकर यांनी केली आहे. रविश रासकर यांनी याबाबतचे निवेदन सार्वजनिक बांधकाम विभागाचे अहिल्यानगर कार्यालयाचे अधिकारी बढध्ये यांना दिले आहे. आत्ताच झालेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार नगर शिरूर हा रस्ता अतिशय निकृष्ट दर्जाचा झालेला आहे. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेत. ठिकठिकाणी अनधिकृत बांधकामे फोडलेले आहेत. कुठल्याही चौकामध्ये गावचे दिशादर्शक फलक नाही. रस्त्याच्या बाजूने वृक्ष लागवड इस्टिमेट मध्ये असताना ही कुठेही वृक्ष लागवड झालेली नाही. रात्री रस्त्यावर गाड्या चालवताना साईडने पांढरा साईट पट्ट्या नसल्याने वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज येत नाही व अपघात होऊन मनुष्य हानी होते. रस्त्यावर लेयर देणे गरजेचे असल्या कारणाने रस्त्यावर कुठल्याही प्रकारचे लेयर देण्यात आले नाहीत. रस्त्यावर अपघात झाल्यानंतर सुपा टोल नाक्यावर कुठलीही इमर्जन्सी सुविधा उपलब्ध नाही. ॲम्बुलन्स, क्रेन, जेसीबी ही कुठलीही सुविधा उपलब्ध नाही. वारंवार पाठपुरावा पा करूनही सुपा टोल मॅनेजमेंट ने कुठल्याही प्रकारची रस्त्यावर सुविधा देण्याचा प्रयत्न केलेला नाही. शिरूर नगर रस्ता हा पूर्णतः निकृष्ट झाल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सुपा टोलनाका हा बंद करण्यात यावा. वाहन चालकांना व गोरगरीब सामान्य जनतेची लूट थांबवावी. सुपा टोलनाका हा मंगळवार पर्यंत बंद झाला नाही. तर कामगार नेते रविश रासकर हे मंगळवार, दि.०९ सप्टेंबर २०२५ रोजी सुपा टोल नाका कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणाला बसणार आहे. त्यानंतर होणाऱ्या हानीस सर्वस्वी शासन जबाबदार राहील. असे कामगार नेते रविश रासकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग अहिल्यानगर अधिकारी बढध्ये साहेब यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. निवेदनाच्या प्रती सुपा पोलीस स्टेशन, सुपा टोल नाका, एसपी ऑफिस, जिल्हाधिकारी कार्यालय यांना दिल्या आहेत.

## गांजा तस्करी उघड, गाडीसह २.१० लाखांचा मुद्देमाल जप्त



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०३, विंचूर (नाशिक) :** लासलगाव पोलिसांनी गांजाच्या अवैध तस्करीवर मोठा घाव घालत दोन संशयितांना अटक करून तब्बल २,१०,००० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**घटना कशी घडली :-**

दि.०२ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ११.४७ वाजता पोलिसांना गुप्त माहिती मिळाल्यानंतर भरवस फाटा येथे सापळा रचण्यात आला. यावेळी MH 04 EN ८८११ क्रमांकाची स्विफ्ट डिझायर गाडीने, एका दुचाकीस MH.15 GH.५३४७ मागून धडक दिली असता, ती स्विफ्ट कार अडवून तपासणी केली असता, त्यामधून ९८५ ग्रॅम गांजा (किंमत ५,०००), दोन मोबाईल हँडसेट, रोख रक्कम यांसह एकूण २,१०,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. संशयित आरोपी या प्रकरणी सलीम कामूद्दीन पिंजारी, राजू हाजी अहमद पिंजारी हे (दोघेही रा. पिंपळगाव बसवंत, जि. नाशिक) यांच्यावर भादंवि कलम २८१, १२५(अ), १२५(ब), ३२४(४), १३४, १७७ तसेच एन.डी.पी.एस. कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जप्त मुद्देमाल – स्विफ्ट डिझायर कार (MH 04 EN ८८११), दोन मोबाईल हँडसेट, रोख रक्कम, ९८५ ग्रॅम गांजा, एकूण किंमत – ₹२,१०,००० या कारवाईमुळे परिसरातील अवैध गांजा तस्करीला मोठा आळा बसेल, असा विश्वास व्यक्त केला जात असून, पुढील तपास लासलगाव पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मोहन पाटील करीत असून, लासलगाव पोलिसांच्या दक्षतेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## सकल ओबीसी समाजाच्या वतीने तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्याकडे मागणी




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, पालम (परभणी) :** राज्यातील इतर मागासवर्गीय समाजावर अन्यायकारकपणे काढलेला जीआर शासनाने तात्काळ रद्द करून समाजाला न्याय देण्याचे काम करावे. या मागणीसाठी दिणक ०३ सप्टेंबर २०२५ रोजी पालम तालुक्यातील सकल ओबीसी समाजाच्या वतीने ढोल ताशाच्या गजरात आक्रमक घोषणाबाजी देत तहसीलदारा मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनद्वारे मागणी करण्यात आली आहे. राज्य शासनाने राज्यातील इतर मागास असलेल्या समाजावर इतर समाजाला ओबीसी मध्ये घेऊन या समाजावर अन्याय केला असून काढलेला जीआर राज्य शासनाने तात्काळ रद्द करून ओबीसी समाजाला न्याय देण्याचे काम करावे, ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व, हक्क आणि आरक्षण आरक्षित राहावे यासाठी शासनाने ठोस धोरण जाहीर करावे. आधीच मर्यादित संधी असलेल्या ओबीसी समाजातील घटकांना आणखीन मागे टाकला जाईल. यामुळे काढलेला हा जीआर राज्य शासनाने तात्काळ मागे घ्यावा यासह इतर मागणीसाठी तालुक्यातील सकल ओबीसी समाजाच्या वतीने अहिल्याबाई होळकर मंदिरापासून तहसील कार्यालया पर्यंत ढोल ताशाच्या गजरात तहसीलदारा मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. यावेळी नगरसेवक ज्ञानराज घोरपडे, गणेशराव घोरपडे, विजयकुमार घोरपडे, दतराव शेगुळे, विजय गणार,माऊली घोरपडे मंगेश घोरपडे, मारोती नाईकवाडे, बाळासाहेब ढोले, तानाजी पैके, राम गावंडे, विठ्ठल पांचाळ, विशाल गावंडे, सतिश बनसोडे, कैलास घोरपडे, गजानन सुरणर सुदाम घोरपडे,नितिन जाधव, पि,एस,लोखंडे विनोद घोरपडे, रुखमाजी गिनगिने सह तालुक्यातील ओबीसी समाज बांधवांची प्रमुख उपस्थिती होती.

## मांडवे खुर्दच्या शिक्षकांचा जालिंदरनगर शाळेत अभ्यास दौरा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०३, पारनेर (अहिल्यानगर) :** गटशिक्षण अधिकारी कांतीलाल ढवळे यांनी शिक्षकांसाठी थेट पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्यातील जालिंदरनगर शाळेचा अभ्यास दौरा आयोजित केला होता.

दरम्यान या प्रयोगातून शिक्षकांमध्ये विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी कौशल्य विकसित होईल असे मत ढवळे यांनी व्यक्त केले आहे. जालिंदरनगर शाळेने आंतरराष्ट्रीय स्तरावर अध्यायनाच्या माध्यमातून नवीन ओळख निर्माण केली आहे.

पारनेर तालुक्यातील जि.प. प्राथमिक शाळा मांडवे खुर्द गावठाण, काळेपाईन वस्ती, दिलबादशहा वस्ती मांडवे खुर्द येथील शिक्षक, शिक्षिका, मांडवे खुर्द गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य, पालक, निवृत्त शिक्षक व ग्रामस्थ यांनी आंतरराष्ट्रीय दर्जाची प्रसिद्ध जालिंदरनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला नुकतीच भेट दिली. जालिंदरनगर शाळेतील विविध नाविन्यपूर्ण उपक्रम व भौतिक सुविधांची पाहणी करत त्यांचे एक विशेष कौतुक केले.

या शाळेने आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान आहे. या शाळेतील आदर्श शिक्षक सन्माननीय दत्तात्रय वारे सर यांच्या नेतृत्वाखाली शाळेत रोबोटिक, कोडिंग, आर्ट क्राफ्ट अंतर्गत पेंटिंग, ज्वेलरी मेकिंग, आरी वर्क, मुक्त छंद सुसज्ज वाचनालय, रेकॉर्डिंग स्टुडिओ, नाविन्यपूर्ण प्रयोगशाळा, स्विमिंग पूल, स्वच्छता गृह, आर.ओ. फिल्टर यांसारख्या अत्याधुनिक सुविधांचे नियोजन व वापर प्रत्यक्ष पाहायला मिळाले.

विशेष म्हणजे येथील विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेसह संस्कृत, इंग्रजी, जपानी, जर्मन अशा आंतरराष्ट्रीय भाषांचे व ५००च्या नोटेवर असणाऱ्या सर्व भारतीय भाषांचे बेसिक शिक्षण दिले जाते. याशिवाय शाळेत डिजिटल क्लास रूम, टॅबलेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप तसेच सर्व स्किलबेस रॉ मटेरियल विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असल्याचे दिसून आले. या शाळेत हायड्रोफोनिक पद्धतीने पिकविला जाणारा भाजीपाला ही एक नाविन्यपूर्ण गोष्ट अनुभवायला मिळाली. ही शाळा आणि तिचे नाविन्य पूर्ण उपक्रम शिक्षकांची सुनियोजीत कार्यपद्धती यांचे आदर्श उदाहरण जागतिक पातळीवर सुद्धा ठरलेली आहे. शिक्षक, विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ व ग्रामपंचायत यांचा चांगला ताळमेळ बसल्यानंतर अगदी कमी कालावधीत किती सकारात्मक गोष्टी घडू शकतात याचा अनुभव आज प्रत्यक्ष पहायला मिळाला. आज खऱ्या अर्थाने कौशल्यांवर आधारित एक गुणवत्तापूर्ण व भौतिकदृष्ट्या आदर्श शाळा पहायला मिळाली व आपल्या शाळेमधेही आणखी काही नवनवीन बदल घडवून आणण्याच्या दृष्टिकोनातून महत्वपूर्ण प्रेरणा मिळाली.

## मराठा आंदोलनाची सांगता; नवी मुंबईतून २१ टन कचऱ्याचे संकलन



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०३, नवी मुंबई :** मुंबई मध्ये सुरु असलेल्या मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आंदोलक मोठया संख्येने नवी मुंबईमध्ये सिडको एक्झिबिशन सेंटर व इतर ठिकाणी थांबलेले होते. ०२ सप्टेंबर रोजी आंदोलनाची सांगता झाल्यानंतर हे नागरिक आपापल्या गावाकडे परतले. राज्याच्या इतर भागांतून एकाच वेळी इतक्या मोठया संख्येने नागरिक नवी मुंबईमध्ये आल्याने शहर स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी दिले होते. त्या अनुषंगाने दैनंदिन स्वच्छता कार्यात या भागात विशेष स्वच्छता पथके तैनात करण्यात आली होती.

त्याचप्रमाणे आंदोलनाची सांगता झाल्यानंतर आयुक्तांच्या निर्देशानुसार, अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ. अजय गडदे यांच्या माध्यमातून २ सप्टेंबर रोजी रात्रीपासून पहाटे ४ वाजेपर्यंत या भागात स्पेशल क्लिनींग ड्राईव्ह राबविण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने सिडको एक्झिबिशन सेंटर व त्याचा परिसर तसेच सेक्टर ३० वाशी आणि तुंगा हॉटेल आसपासचा परिसर आणि सायन पनवेल हायवे परिसर याठिकाणी सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

या मोहीमेत १०० हून अधिक स्वच्छताकर्मी, स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक तसेच २ यांत्रिकी सफाई मशीन, ३ सिव्हरेज जेटिंग मशीन तसेच कचरा संकलन व वाहतूक करणारी वाहने यांच्या माध्यमातून २१ टन इतक्या मोठया संख्येने कचरा संकलीत करण्यात आला व तुर्भे येथील प्रकल्पस्थळी वाहून नेण्यात आला. आंदोलन संपल्यानंतर तत्परतेने रात्रीच ही विशेष मोहीम हाती घेऊन पहाटे ४ पर्यंत अथक काम करुन दुसऱ्या दिवसाचा सूर्य उगविण्यापूर्वीच हा संपूर्ण परिसर नेहमीसारखा स्वच्छ केल्याने त्या परिसरात मॉर्निंग वॉकला तसेच कामासाठी जाणाऱ्या नागरिकांकडून महानगरपालिकेच्या तत्पर स्वच्छता कार्याची प्रशंसा करण्यात आली.

## के.रामलू शाळेच्या ८ विद्यार्थ्यांचे जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०३, कुंडलवाडी (नांदेड) :** दिनांक ०३ सप्टेंबर २०२५ रोजी बिलोली तालुकास्तरीय पावसाळी क्रीडा श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल शारदानगर सगरोळी येथे पार पडली. या स्पर्धेत के.रामलू शालेच्या खेळाडूंनी यश संपादन केले. यात १४ वर्षांखालील मुला मुलींचा बुद्धिबळ स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांचा संघ विजेता ठरला,यात१४ वर्ष वयोगटातून प्रथमेश चंदर अनंतवार प्रथम, विश्वजीत सयाराम पाशावार द्वितीय, मनोज माधव लोलापोड तृतीय मुलीमध्ये कु. श्रेया संजय गट्टूवार प्रथम, प्रियंका दत्तूसिंग ठाकूर द्वितीय, श्रीमई संतोष भाले तृतीय तर १७ वर्षांखालील गटात मुला मुलींचा संघ विजेता राहिला. १७ वर्षांखालील गट स्पर्धेमध्ये मुलामध्ये श्रीराम राजेश्वर इंदूरकर प्रथम, आशिष अंजया जायेवार द्वितीय, वेदांत गंगाधर तांडूरवार तृतीय तर, मुलीमध्ये कु. ख़ुशी लक्ष्मण मांजरे प्रथम तर कु.अदिती अशोक धुप्पे द्वितीय क्रमांक पटकावले असून यातील प्रथम व द्वितीय आलेल्या ८ मुलां-मुलींचे जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाले आहे. तालुकास्तरावर यश संपादन केलेल्या खेळाडूंची व त्यांचे मार्गदर्शक कासलोड आर. बी, गोविंद बिलोलीकर, अर्चना नरोड यांचे या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. सर्व विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष श्री साईरेड्डी ठक्कुरवार सचिव यशवंत संगमवार संचालिका रमा ठक्कुरवार शाळेचे प्रिंसिपल जे संभाजी व्हाय प्रिंसिपल एम सपना यांनी अभिनंदन केले आणि पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## नवी मुंबई पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्याकरिता संविधान परिचय कार्यशाळा संपन्न



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०३, नवी मुंबई :** ऐरोली येथील नवी मुंबई महानगरपालिकेच्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकात गणेशोत्सवापूर्वी नुकतीच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत विविध पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी, कर्मचारी यांचेकरिता 'संविधान परिचय कार्यशाळा' मोठ्या उत्साहात पार पडली.

भारतीय संविधानास ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त संपूर्ण देशभरात 'संविधान अमृत महोत्सव' साजरा होत आहे. या अमृत महोत्सवी संविधान पर्वाच्या अनुषंगाने नमुंमपा च्या वतीने आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई संविधान साक्षर होण्याच्या दृष्टीने 'घर घर संविधान' अभियानांतर्गत वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहे.

या अंतर्गत महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी वृंदासाठी परिमंडळ व विभाग कार्यालयनिहाय संविधान परिचय कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते. त्याचाच पुढचा टप्पा म्हणजे नवी मुंबई पोलिस आयुक्तालयांतर्गत असलेल्या विविध पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचारी व अधिकारी यांच्याकरिता पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांच्या मान्यतेनुसार संविधान परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी माजी निवडणूक आयुक्त जे.एस. सहारीया यांनी उपस्थित पोलीस अधिकारी, कर्मचारी यांना संविधानातील मूल्ये, नागरिकांचे हक्क व कर्तव्य तसेच कायद्याची अंमलबजावणी करताना पोलीस दलाची भूमिका या विषयावर अभ्यासपूर्ण माहिती देत संविधानाचे महत्व विषद केले.

या शिबिरापूर्वी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील बेलापूर ते दिघा विभागातील साधारणत: ८०० महिला बचत गटांतील सदस्यांसाठी विभागनिहाय संविधान परिचय कार्यशाळांचे आयोजन करून संविधान साक्षर करण्यात आले. समाजातील विविध घटकांपर्यंत संविधानाचे महत्व आणि माहिती पोहचवून नवी मुंबई हे संविधान साक्षर शहर करण्याच्या संकल्पपूर्तीसाठी या कार्यशाळांचे ठिकठिकाणी आयोजन केले जात आहे.

## प्रधानमंत्री यांच्या जन्मदिनानिमित्त देशभरात सेवा पंधरवडा साजरा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३ :** केंद्रीय युवा कार्य व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे विविध राज्यांच्या क्रीडा मंत्र्यांशी संवाद साधला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या जन्म दिनानिमित्त दिनांक १७ सप्टेंबर २ ऑक्टोबरपर्यंत देशभरात सेवा पंधरवडा साजरा केला जाणार आहे. या उपक्रमांतर्गत युवकांमध्ये क्रीडा प्रेम जागविण्यासाठी व निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यासाठी देशभरातील ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉनचे आयोजित केले जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी राज्याचे क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांच्यासह विविध राज्यांचे क्रीडा मंत्रीही ई-उपस्थित होते. या दरम्यान २१ सप्टेंबर रोजी ७५ ठिकाणी नमो मॅरेथॉन होईल. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त ३१ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर दरम्यान एकतेचा संदेश देणाऱ्या पदयात्रेचे देशभर आयोजन करण्यात येणार आहे.

अक्षराज



# सरकारचा प्रतिनिधी आल्याशिवाय आम्ही उपोषण सोडणार नाही ; उपोषण सुरूच राहणार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०३, चंद्रपूर :** राष्ट्रीय ओबीसी महासंघाने ३० ऑगस्ट पासून नागपूर येथील संविधान चौकात बेमुदत साखळी उपोषण महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ बबनराव तायवाडे, महासचिव सचिन राजुरकर, याचे प्रमुख उपस्थितीत सुरू केले आहे. आज उपोषणाचा पाचवा दिवस आहे. खालील मागण्या घेऊन राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे साखळी उपोषण सुरु आहे.



मराठा जातीचा ओबीसी संवर्गात समावेश करण्यात येऊ नये व सरसकट मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यात येऊ नये. अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतक-यांना त्वरीत नुकसान भरपाई देण्यात यावी. ओबीसी मुलांना व्यावसायीक अभ्यासक्रमास १०० टक्के शिष्यवृत्ती लागु करण्यात यावी. गुणवंत मुलांमुलीना परदेशात उच्च शिक्षणासाठी देण्यात येणारी शिष्यवृत्ती ७५ विद्यार्थ्यांची संख्या वाढवुन २०० विद्यार्थी करण्यात यावी. महाज्योती या संस्थेकरीता एक हजार कोटी रूपयांची तरतुद करण्यात यावी, शासन निर्णय दिनांक २८ आक्टो. २०२१ च्या नुसार ज्या प्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी च्या शासन निर्णयानुसार समाजातील संस्थाना कामात प्राधान्य देण्यात येते, त्याप्रमाणे महाज्योतीची कामे ओबीसी, विजा, भज व विशेष मागास प्रवर्गातील संस्थेला रोजगार उपलब्ध व्हावा, यासाठी प्राधाण्य देण्यात यावे. म्हाडा व सिडको तर्फे बांधुन देण्यात येणा-या घरकुल योजनेत ओबीसी संवर्गाकरीता आरक्षण लागु करण्यात यावे. नागपुर येथे तयार असलेले उच्च व तंत्र विभागाचे स्व. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षानिमीत्त बांधलेले २०० मुलींचे तयार वसतीगृह तसेच नागपुर येथे स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दी वर्षानिमीत्त तयार असलेले २०० मुलांचे वसतीगृह ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी संवर्गातील विद्यार्थ्यांच्या वसतीगृहासाठी ओबीसी बहुजन कल्याण विभागाकडे हस्तांतरीत करून शासन निर्णयान्वये इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागामार्फत मुलांचे व मुलींचे वसतीगृह सुरू करण्यात यावे. ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी आर्थिक विकास महामंडळा मफित असलेली थेट कर्ज योजनेची मर्यादा १ लाख व १५ लाख रुपये कर्ज मर्यादेच्या योजनेसाठी, तसेच गहाण खतामध्ये फक्त शेतीची अट असून ती शिथिल करण्यात यावी घर., प्लॉट, दुकान इत्यादी बाबींचा समावेश व्हावा जामीनदार घेतांना केवळ सरकारी. नौकरच असावा ही अट शिथिल करण्यात यावी, ५०० सीबील स्कोरची अट शिथिल करुन लाभ धारकांना अटच नसावी. शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळ, अण्णाभाऊ साठे आर्थिक विकास महामंडळ, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ या धर्तीवर इतर मागास आर्थिक विकास महामंडळाला अँड जनार्दन पाटील ओबीसी आर्थिक विकास महामंडळ असे नाव द्यावे. प्रत्येक शहर व तालुका स्तरावर ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी सुसज्ज ग्रंथालय सुरु करण्यात यावे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभुषण पुरस्कार आणि आदिवासी सेवक पुरस्कार याप्रमाणे डॉ पंजाबराव देशमुख ओबीसी समाजसेवक पुरस्कार जाहीर करण्यात यावा. अनुसूचित जातीजमाती प्रमाणे ओबीसी, विजा, भज व विशेष मागास प्रवर्ग शेतकरुयांना १०० टक्के सवलतीवर राज्यात योजना सुरु करण्यात याव्यात. ओबीसी आर्थिक विकास महामंडळाला एक हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात यावी व महामंडळाच्या सर्व मंजूर योजना त्वरीत सुरु करण्यात याव्यात. ओबीसी, वीजा, भज व विमाप्र समुदायातील पीएचडी संशोधक विद्यार्थांची तीन वर्षापासून प्रलंबित असणारी फेलोशिप त्वरित अदा करण्यात यावी.

राष्ट्रीय ओबीसी महासंघातर्फे संविधान चौकात सुरू करण्यात आलेल्या साखळी उपोषणाच्या पाचवा दिवशी या उपोषणाला सुनील सवाई, किरण नेरकर, वसंतराव राऊत, विजय ठाकरे, ओमकार चौधरी, रत्नाकर लांजेवार, बाबासाहेब भोयर, राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या उपोषणाला आज डॉ. परिणय फुके, शेषराव येलेकर, प्रकाश साबळे, राहुल तायडे, प्रवीण वानखेडे, अनिल ठाकरे, गुणेश्वर आरीकर, सोनोने सर, अनिल कंठीवार, राष्ट्रीय ओबीसी महासंघ जिल्हा गडचिरोली चे जिल्हा सचिव सुरेश भांडेकर, पुरुषोत्तम मस्के, प्राध्यापक त्र्यंबक करोडकर, वासुदेव कुडे, उमेश आखाडे, पांडुरंग नागापुरे, घनश्याम जकुलवार, युवा अध्यक्ष राहुल भांडेकर, महिला जिल्हाध्यक्षा मंगला कारेकर, युवती अध्यक्ष संतोषी सूत्रपवार, महेंद्र लटारे, प्रफुल आंबोरकर, संदीप चापले, पंकज खोबे, अंकुश मोगरकर, आरमोरी वरुण चेतन भोयर, मिथुन शेबे, आकाश सोनटक्के सह नागपूर, अमरावती, चंद्रपूर, व गडचिरोली या जिल्ह्यातील असंख्य कार्यकर्ते हजर होते.

## * जाहीर सुचना *

या द्वारे सर्व संबंधितांना सुचीत करण्यात येते की, श्री. अनिल जानकीराम पाल रा. घाटकुळ ता. पोंभुर्णा जि. चंद्रपुर यांची मौजा घाटकुळ ता. पोंभुर्णा जि. चंद्रपुर येथिल सर्व्हे क्रं. १६२ आराजी २.७० हे.आर. भोगवटदार वर्ग-१ गाव नमुना ७/१२ उताऱ्यावरील ईतर अधिकारातील साधे कुळ जानकीराम पैका यांच्या नावाची नोंद कमी करण्याबाबत अर्ज या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

तरी ज्या कोणास या बाबत काही आक्षेप / हरकत असल्यास दिनांक ०८/०९/२०२५ पावेतो तहसिल कार्यालय पोंभुर्णा ता. पोंभुर्णा जि. चंद्रपुर या ठिकाणी स्वतः किंवा अभिकर्त्यामार्फत लेखी स्वरूपात विहीत मुदतीत आक्षेप / हरकत सादर करावे. विहीत मुदतीनंतर आक्षेप / हरकती प्राप्ती झाल्यास कोणतीही तक्रार ग्राहय धरण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

(सही)
(मोहनिश शेलवटकर)
तहसिलदार, पोंभुर्णा

# रेल्वे कर्मचारी राधेश्याम पिन्नलवार सेवानिवृत्त

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०३, मुदखेड (नांदेड) :** नांदेड रेल्वे डिव्हिजनचे रेल्वे कर्मचारी राधेश्याम पिन्नलवार हे ३० ऑगस्ट रोजी आपली सेवा पुर्ण करून वयतनियमानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. नांदेड रेल्वे डिव्हिजन कार्यालयात रेल्वे कर्मचारी राधेश्याम पिन्नलवार व त्यांच्या सौभाग्यवती मंगल राधेश्याम पिन्नलवार या दोघांचा सेवानिवृत्त कार्यक्रमात शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला आहे. डेप्युटी चीप इंजिनिअर प्रकाश प्रजापत यांनी कार्यक्रमा निमित्त बोलताना म्हणाले की राधेश्याम पिन्नलवार यांनी रेल्वे विभागात कार्यरत असताना जबाबदारीने प्रत्येक काम केले आहे असं सांगितलं. मुदखेड येथील रहिवासी राधेश्याम पिन्नलवार हे १९८४ डिव्हीजनल इंजिनिअर कार्यालय मुदखेड येथे पहिली पोस्टिंग, त्यानंतर आदिलाबाद, नांदेड, परभणी, परळी, निझामबाद, कामारेडी, मेडचल, वाशिम, आकोला, आकोट, खंडवा, जालना, संभाजीनगर यांच्यासह आदी ठिकाणी ४० वर्ष नोकरी करत संभाजीनगर येथे सेवानिवृत्त झाले आहे.

# गणेशोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्र सदनात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**दि.०३, नवी दिल्ली :** गणेशोत्सवाचा उत्साह आणि आरोग्यसेवेचा संकल्प यांचा सुंदर ताळमेळ साधत, महाराष्ट्र सदनात मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन आज, निवासी आयुक्त तथा सचिव श्रीमती आर. विमला यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्र सदन, कोपर्निकस मार्ग येथे सुरू असलेल्या दहा दिवसीय गणेशोत्सवाच्या उत्साहपूर्ण वातावरणात या शिबिराचे आयोजन महाराष्ट्र सदन, वनराई फाऊंडेशन आणि महाराजा अग्रसेन हॉस्पिटल चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे.

उद्घाटनप्रसंगी बोलताना श्रीमती आर. विमला म्हणाल्या, गणेशोत्सव हा आनंद आणि भक्तीचा सण आहे. याच उत्सवाच्या निमित्ताने समाजाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. गणपती बाप्पा सर्वांना सुख, समृद्धी आणि निरोगी आयुष्य देईल, हीच प्रार्थना आहे. त्यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांना या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन केले.



दिनांक ३ आणि ४ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत जुने महाराष्ट्र सदन येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये रक्तदाब, मधुमेह, हृदयरोग तपासणी, नेत्र तपासणी, तसेच सामान्य आरोग्य तपासणी यासारख्या विविध चाचण्या मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहेत. शिबिरात तज्ज्ञ डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचारी उपस्थित असून, नागरिकांना आरोग्यविषयक सल्ला आणि मार्गदर्शनही केले जाणार आहे. अधिकाधिक लोकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन निवासी आयुक्त आर विमला यांनी केले आहे.

# इन्स्टाला ओळख, विद्यार्थिनीला प्रेमाच्या जाळ्यात ओढलं, अपहरण करुण अत्याचार

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, नागपूर :** प्रेमाच्या जाळ्यात अडकवून अपहरण करून विद्यार्थिनीवर बलात्कार प्रकरणात अटक केल्यानंतर पोलिस कोठडीतून फरार झालेल्या आरोपीला हिंगणा पोलिसांनी चाळीसगाव येथे अटक केली. गणेश भिकन गोसावी (वय २०, रा. विखरन, ता. एरंडोल, जि. जळगाव) असं अटकेतील आरोपीचं नाव आहे.

तो मालवाहू वाहनावर चालक आहे. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, १७ वर्षीय मुलगी बारावीत शिकते. दीड वर्षांपूर्वी तिची इन्स्टाग्रामवर गणेशसोबत ओळख झाली. त्याने तिला प्रेमाच्या जाळ्यात अडकविले. नोव्हेंबर महिन्यात गणेशने तिचं अपहरण केलं. तिच्यावर बलात्कार केला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून गणेशला अटक केली. पीडित मुलीला नातेवाइकांच्या स्वाधीन केलं. १० जुलैला गणेशने पुन्हा तिचं अपहरण केले. तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर पीडित मुलगी घरी परतली. नातेवाइकांना घडलेली घटना सांगितली. नातेवाइकाने हिंगणा पोलिसांत तक्रार केली.



पोलिसांनी अपहरण व बलात्कारासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. हिंगणा पोलिसांनी ३० ऑगस्टला गणेश याला मध्यप्रदेशातील धार येथील पिथमपूर येथून अटक केली. त्याला नागपुरात आणून न्यायालयात हजर केले. न्यायालयाने त्याची ३ सप्टेंबरपर्यंत पोलिस कोठडीत रवानगी केली. यादरम्यान पोलिसांनी वैद्यकीय तपासणीसाठी त्याला हिंगण्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले. पोलिसांच्या हातावर तुरी देऊन गणेश तेथून पसार झाला. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक कृष्णा खेबडे, हेडकॉन्स्टेबल अजय गिरडकर, आनंद वानखेडे, सचिन इंगळे यांनी गणेशचा शोध सुरू केला. गणेश हा चाळीसगाव परिसरात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. स्थानिक पोलिसांच्या मदतीने हिंगणा पोलिसांनी सापळा चरून त्याला अटक केली. त्याला नागपुरात परत आणलं.

## थोडक्यात

# मराठा समाजास कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात येणार

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०३, ठाणे :** जात प्रमाणपत्र देणे आणि त्याची पडताळणी करणे याकरिता सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३ व त्याअंतर्गत कार्यपद्धती निश्चितीकरिता नियम तयार करण्यात आलेले आहेत. यामध्ये हैद्राबाद गॅझेटिअरमधील नोंदी विचारात घेऊन मराठा समाजाच्या व्यक्तींना कुणबी, मराठा-कुणबी किंवा कुणबी-मराठा जातीचे प्रमाणपत्र मिळविण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी गावपातळीवर समित्या गठीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतचा सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने आज शासन निर्णय क्र. सीबीसी- २०२५/ प्र.क्र. १२९/ मावक दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ निर्गमित केला आहे.

गावपातळीवर गठीत समिती मध्ये ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, सहायक कृषी अधिकारी यांचा समावेश असेल. मराठा समाजातील भुधारक तसेच भूमिहीन, शेतमजूर किंवा बटईने शेती करत असलेल्या व्यक्तींकडे शेत जमिनीची मालकी असल्याचा पुरावा नसल्यास त्यांनी दि.१३ ऑक्टोबर १९६७ पूर्वीचे वास्तव्य दाखविणारे प्रतिज्ञापत्र सादर करावे.

तसेच, त्यांच्या कुळातील किंवा नातेसंबंधातील व्यक्तींना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळाले असल्यास व त्यांनी अर्जदारासंबंधी प्रतिज्ञापत्र दिल्यास, स्थानिक समिती आवश्यक चौकशी करून अहवाल सादर करेल. सक्षम प्राधिकारी या चौकशीच्या आधारे अर्जदारास कुणबी जातीचा दाखला देण्याचा निर्णय घेतील. याबाबत कार्यपद्धती करण्यात आलेला शासन निर्णयात नमूद करण्यात आली आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत लोकचळवळ उभी करण्यासाठी कार्यशाळा संपन्न



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, ठाणे :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत लोकचळवळ उभी करण्यासाठी जिल्हा स्तरावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. दि.३ सप्टेंबर, २०२५ रोजी ठाणे येथील बी. जे. हायस्कूल सभागृह, टेंभी नाका येथे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या शासनाच्या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत जिल्हास्तर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत जिल्हा परिषदेबरोबरच जिल्ह्यातील सर्व विभागांचे प्रतिनिधी, अधिकारी व पदाधिकारी उपस्थित राहून अभियानाची उद्दिष्टे, भूमिका व जबाबदाऱ्या यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.या कार्यशाळेच्या माध्यमातून ग्रामविकासाला गती देऊन प्रत्येक गावात शाश्वत विकास साधण्यावर भर देण्यात आला.

ग्रामपंचायतींनी पीएम आवास, जलसंधारण व महसुलाशी संबंधित काम वेळेत करावे. समन्वय ठेवावा तसेच ग्रामपंचायतीना अभियानात पात्र होण्यासाठी गटविकास अधिकारी व ग्रामपंचायत अधिकारी यांनी पुढाकार घेऊन ग्रामस्थांना योजनांची अचूक माहिती द्यावी. या कार्यशाळेत मनरेगा अंतर्गत घरकुल, पशुवैद्यकीय दवाखाने व सार्वजनिक मत्ता यांचे नोंदी व सुस्थितीत असल्याची दक्षता घेण्याबाबत सुचना दिल्या. महिला बचतगट, बांबू लागवड उपक्रम तसेच त्यासाठी बाजारपेठ उभारणी, आरोग्य व पायाभूत सुविधांसाठी मिशन कायाकल्पांतर्गत योजना प्रभावीपणे राबवावे. सौरदिवे, ई-लायब्ररी सारखे जिल्ह्यात नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्यासाठी जिल्हा परिषदेने पुढाकार घ्यावा. तसेच सर्व गांमपंचायतींना मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांत सहभागी होण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिल्या.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी ग्रामविकासाची खरी ताकद लोकसहभागात असल्याचे सांगून प्रत्येक ग्रामपंचायतीने स्वनिधी, जलसमृद्धी, घरकुल, पशुवैद्यकीय दवाखाने, सार्वजनिक मत्ता व उपजीविका योजनेसारख्या उपक्रमांवर ठोस काम काज करावे, असे आवाहन केले. त्यांनी स्वामित्व योजना, मिशन कायाकल्प, आरोग्य सुधारणा आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची अंमलबजावणी करून ग्रामपंचायतींनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात जल्लोषाने सहभागी व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यशाळेत सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण, संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभागातून लोकचळवळ, नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच विविध मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. स्वनिधी निर्मिती व लोकवर्गणीद्वारे ग्रामपंचायतींचे आर्थिक सक्षमीकरण, पाणीपुरवठा, जलसंधारण व पर्यावरण संवर्धन, शेततळे व घरकुल बांधकाम योजनेशी अभिसरण, ग्रामपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण आणि महिला बचतगट, शेतकरी व दुर्बल घटकांसाठी ठोस उपाययोजना यावर विशेष भर देण्यात आला.

सरपंच (काल्हेर) आश्लेषा पंकज तरे यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत अधिकाधिक ग्रामपंचायती पात्र व्हाव्यात आणि स्पर्धेत जिंकावे यासाठी प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगितले.

कार्यशाळेला प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.) अविनाश फडतरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, कार्यकारी अभियंता (बांधकाम) पद्माकर लहाने, समाज कल्याण विभाग प्रमुख उज्वला सपकाळे, कृषी विकास अधिकारी एम. एम. बाचोटीकर तसेच मोठ्या संख्येने ग्रामपंचायत अधिकारी, सरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते.

# उपमुख्यमंत्री पवार यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०३, मुंबई :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली बीड - अहिल्यानगर रेल गाडी सुरु करण्यासदंर्भात बैठक पार पडली. बैठकीस विविध विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. येत्या १७ सप्टेंबरला मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड ते अहिल्यानगर रेल गाडीला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात येणार आहे. यामुळे अनेक वर्षांपासूनचे बीडवासीयांचे रेल्वे सेवेचे स्वप्न पूर्ण होणार आहे. २६१.२५ किलोमीटर लांबीचा हा मार्ग आहे. बीड ते परळीवैजनाथ रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाची प्रलंबित प्रकरणे बीड जिल्हा प्रशासनाने तातडीने निकाली काढून आवश्यक जमीन उपलब्ध करून द्यावी. या रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम तातडीने अदा करण्यात यावी. अर्थसंकल्पात मंजूर १५० कोटी रुपये देण्यात यावे. उर्वरित १५० कोटी रुपयांची तरतूद करावी. फलटण ते लोणंद या रेल्वे मार्गावरील प्रलंबित कामे पूर्ण करावीत असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.